**ठळक बातम्या**

- भारत जगातली तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था झाल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, थोड्याच वेळात राष्ट्रपती देशाला संबोधित करणार

- ज्येष्ठ अभिनेता धर्मेंद्र यांच्यासह ५ जणांना पद्मविभूषण, १३ जणांना पद्मभूषण, तर ११३ जणांना पद्मश्री पुरस्कार जाहीर, महाराष्ट्रातले १२ जण पद्मश्रीचे मानकरी

- पोलीस, आणि इतर सुरक्षा दलांमधले ९८२ कर्मचारी शौर्य आणि सेवा पदकांनी सन्मानित, राज्यातल्या ८९ अधिकारी - कर्मचाऱ्यांचा समावेश

**आणि**

- भारत-न्यूझीलंड टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा भारताचा निर्णय

<><><><><>

भारत आज जगातली तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था झाली असून देशातल्या युवांनी नवोन्मेषाच्या क्षेत्रात केलेल्या कामाची नोंद इतिहासात होत आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज मन की बात या कार्यक्रमात केलं. देशात वेगानं वाढत असलेल्या स्टार्टअप्स क्षेत्राचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला.

देशाची अर्थव्यवस्थाही वेगानं पुढे जात असून संपूर्ण जगाचं लक्ष भारतावर आहे. या काळात गुणवत्तेला प्राधान्य द्यायची गरज आहे, असं मत मोदी यांनी मांडलं. ज्या वस्तूंचं उत्पादन भारतात होईल, त्याचा दर्जा आणखी सुधारण्याचा संकल्प करायचं आवाहन त्यांनी केलं.

***होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

देशातल्या सर्व युवांनी वयाची १८ वर्षं पूर्ण केल्यानंतर मतदार म्हणून नोंदणी करावी, यामुळे भारताची लोकशाही बळकट होईल, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज

मतदार दिवसाच्या निमित्ताने केलं. मन की बात या कार्यक्रमातून त्यांनी आज देशवासीयांशी संवाद साधला.

भारत आणि मलेशिया यांच्यातल्या दृढ संबंधांवरही प्रधानमंत्र्यांनी भाष्य केलं. मलेशियात ५०० पेक्षा जास्त तमिळ शाळा असून तिथं या भाषेसोबतच इतर विषयही तमिळमध्येच शिकवले जातात, याचा आवर्जून उल्लेख त्यांनी केला. तसंच, मलेशिया-भारत वारसा सोसायटी करत असलेल्या कामाचंही त्यांनी कौतुक केलं.

गुजरातमध्ये बेचराजीच्या चंदनकी या गावातल्या सामुदायिक स्वयंपाकघरात संपूर्ण गावासाठी जेवण तयार होतं आणि सगळे गावकरी एकत्र बसून जेवतात. या अनोख्या परंपरेचं वर्णन प्रधानमंत्र्यांनी मन की बात कार्यक्रमात केलं. तसंच जम्मू-काश्मीरच्या अनंतनागमध्ये शेखगुंड या गावात वाढणारं व्यसनांचं प्रमाण पाहून सर्व गावकऱ्यंना एकत्र करून अशा पदार्थांची विक्रीच बंद पाडणाऱ्या मीर जाफर यांचाही गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला. याशिवाय, नद्यांचं पुनरुज्जीवन, पर्यावरण संवर्धन, दुष्काळ निवारण, स्वच्छता, भरडधान्याला प्रोत्साहन इत्यादी क्षेत्रांमध्ये भरीव योगदान देणाऱ्या, देशाच्या विविध भागांतल्या नागरिकांचं त्यांनी कौतुक केलं.

पुढच्या महिन्यात होणाऱ्या इंडिया एआय समिटमध्ये तंत्रज्ञान क्षेत्रातले तज्ञ जगभरातून एकत्र येणार आहेत, असं मोदी यांनी नमूद केलं. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातली भारताची प्रगती आणि यश या परिषदेतून जगासमोर येईल, असा विश्वास त्यांनी आजच्या 'मन की बात'चा समारोप करताना व्यक्त केला.

**<><><><><>**

देश उद्या ७७ वा प्रजासत्ताक दिवस साजरा करणार आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, आज थोड्याच वेळात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू देशाला संबोधित करणार आहेत.

उद्या प्रजासत्ताक दिनादिवशी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या उपस्थितीत नवी दिल्लीत कर्तव्य पथावर भव्य कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. सकाळी साडे दहा वाजता प्रजासत्ताक दिवसाच्या संचलनाला सुरुवात होईल, सुमारे ९० मिनिटं हे संचलन होईल. 'स्वतंत्रता का मंत्र : वंदे मातरम' आणि 'समृद्धी का मंत्र : आत्मनिर्भर भारत' ही यंदाच्या प्रजासत्ताक दिनाची संकल्पना आहे.

**<><><><><>**

यंदाचा पद्मविभूषण पुरस्कार ज्येष्ठ अभिनेता धर्मेंद्र यांच्यासह सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती के. टी. थॉमस, विख्यात व्हायोलिनवादक एन. राजम, साहित्य आणि शिक्षणक्षेत्रासाठी पी. नारायणन आणि केरळचे माजी मुख्यमंत्री व्ही. एस. अच्युतानंदन अशा ५ जणांना जाहीर झाला आहे. धर्मेंद्र आणि व्ही. एस. अच्युतनंदन यांना मरणोत्तर हा पुरस्कार दिला जाईल.

एकंदर १३ जणांना पद्मभूषण पुरस्कार जाहीर झाले आहेत. प्रसिद्ध अभिनेत्री अलका याज्ञिक, उद्योगपती उदय कोटक, जाहिरात क्षेत्रातले दिग्गज पियूष पांडे, झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन, अभिनेता मम्मूटी, बॅडमिंटनपटू विजय अमृतराज यांच्यासह इतरांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

तर, देशभरात विविध ठिकाणी वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ११३ जणांना पद्मश्री पुरस्कार आज जाहीर करण्यात आले. यात महाराष्ट्रातल्या १२ मान्यवरांचा समावेश आहे. वैद्यकीय क्षेत्रात अर्मिडा फर्नांडिस, उद्योग क्षेत्रात अशोक खाडे आणि सत्यनारायणन नुवाल, कला क्षेत्रात भिकल्या लाडक्या धिंडा, माधवन रंगनाथन, रघुवीर खेडकर, अभिनेता सतीश शहा, सामाजिक कार्यासाठी जनार्दन बोठे, विज्ञान आणि अभियांत्रिकीसाठी जुझेर वासी, क्रिकेटपटू रोहित शर्मा आणि कृषी क्षेत्रात श्रीरंग देवबा यांना पद्मश्री पुरस्कारानं गौरवण्यात येणार आहे.

याशिवाय, साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातल्या योगदानासाठी कर्नाटकाचे अनके गौडा, सामाजिक कार्यासाठी जम्मू-काश्मीरचे ब्रिज लाल भट, संशोधनासाठी तेलंगणचे डॉक्टर कुमारस्वामी थंगराज, पशुवैद्यकीय शास्त्रासाठी तमिळनाडूचे डॉक्टर पुण्यमूर्ती नटेशन, यांच्यासह एकंदर ५४ जणांना पद्मश्री पुरस्कार दिला जाणार आहे.

**<><><><><>**

प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस, अग्निशमन दल, होमगार्ड, नागरी संरक्षण आणि सुधारगृह सेवांमधील ९८२ कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकांनी सन्मानित करण्यात आलं आहे. यात राज्यातल्या ८९ अधिकारी - कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. यात ३१ पोलीस कर्मचाऱ्यांना वीरता पदक, ४० पोलीस कर्मचाऱ्यांना उल्लेखनीय सेवेसाठी पदक, चार जणांना अग्निशमन सेवेसाठी, तीन कर्मचाऱ्यांना नागरी संरक्षण आणि होमगार्ड

सेवेसाठी,  पाच कर्मचाऱ्यांना सुधारात्मक सेवेसाठी पदक प्रदान करण्यात  आलं. याशिवाय, चार जणांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदकाने सन्मानित केलं गेलं.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला तिसरा क्रिकेट सामना आज गुवाहाटी इथं होत आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

या मालिकेत भारतानं २-० अशी आघाडी घेतली असून आजचा सामना जिंकणं भारताला मालिका जिंकण्याच्या दृष्टीनं महत्त्वाचं आहे.

**<><><><><>**

देशभरात आज १६ वा राष्ट्रीय मतदार दिन साजरा झाला. भारतीय लोकशाहीत नागरिकांची मध्यवर्ती भूमिका ठळकपणे मांडणारी My India, My Vote ही यंदाची संकल्पना आहे. भारत निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाल्याच्या स्मरणार्थ हा दिवस पाळला जातो. मतदारांचं महत्त्व अधोरेखित करणं, निवडणूकांविषयी जनजागृती वाढवणं आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहित करणं हा या दिनाचा उद्देश आहे.

या निमित्तानं नवी दिल्ली इथं झालेल्या राष्ट्रीय कार्यक्रमाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संबोधित केलं. मतदार ओळखपत्रामुळं मतदारांना जगातल्या सगळ्यात मोठ्या लोकशाहीत सक्रिय भागिदार होण्याचा अधिकार मिळतो असं त्यांनी सांगितले.

**- - होल्ड बाईट राष्ट्रपती - -**

देशाचे मतदार प्रलोभनं, खोटी माहिती तसंच दुष्प्रचाराला न भूलता आपल्या विवेकबुद्धीनं देशाच्या निवडणूक व्यवस्थेला सुदृढ बनवतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. निवडणूक आयोगाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे देशाच्या लोकशाहीच्या प्रतिष्ठेत सातत्यानं भर पडत राहील असं त्या म्हणाल्या.

यावेळी राष्ट्रपतींनी निवडणूक प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर, मतदार जागृती, आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी अशा विविध श्रेणींमधे पुरस्कार प्रदान केले. यात मतदारांच्या जागृतीसाठी उत्कृष्ट मोहीम राबवल्याबद्दल आकाशवाणी वृत्तविभागाला

इलेक्ट्रॉनिक रेडिओ श्रेणीत पुरस्कार देण्यात आला. आकाशवाणीचे महासंचालक राजीव कुमार जैन यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

मतदार जनजागृतीसाठी निवडणूक आयोग विविध उपक्रम राबवत असून, प्रथम मतदान करणाऱ्या युवकांवर विशेष लक्ष केंद्रित केलं आहे.

दरम्यान, मतदार नोंदणीला मंजुरी मिळाल्यानंतर १५ दिवसांत मतदार ओळखपत्र देण्याचं नियोजन असल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिली आहे. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त नाशिकमध्ये आज सकाळी काढण्यात आलेल्या सायकल रॅलीत मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम आणि जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी सहभाग घेतला.

**<><><><><>**

श्री. गुरु तेग बहादुर साहीबजी यांच्या साडेतीनशेव्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड इथल्या मोदी मैदान इथं शहिदी सत्संग सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी श्री सचखंड गुरुद्वाराचं दर्शन घेतलं. या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी देशभरातून अनेक मान्यवर नांदेडमध्ये येत आहेत. दिल्लीचे उद्योग, अन्न आणि नागरी पुरवठा, पर्यावरण तसंच वनं मंत्री मनजींदर सिंघ सिरसा तसंच आंध्रप्रदेशचे उपमुख्यमंत्री कोनिडला पवन कल्याण यांचं आज नांदेड इथल्या गुरु गोविंसिंघजी विमानतळावर आगमन झालं.

यानिमित्त बीड इथल्या मुलींच्या शासकीय वसतीगृहात गुरु तेग बहादुर यांचं जीवन आणि कार्यावर आधारित निबंध, रांगोळी आणि वक्तृत्व स्पर्धा आज झाली.

**<><><><><>**

वनाधिकार कायदा आणि पेसा कायद्याची अंमलबजावणी करा, सिंचन योजनेची अंमलबजावणी करा, जिल्हा परिषद शाळांमधली रिक्त पदं भरा आदी मागण्यांसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा पायी मोर्चा नाशिकहून मुंबईकडे निघाला आहे. गेला आठवडाभर पेण, सुरगणा, त्र्यंबकेश्वर इथं आंदोलन करूनही प्रशासनाने दखल न घेतल्यामुळे मुंबईकडे निघाल्याचं माकपच्या नेत्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आयुर्वेदाला जागतिक स्तरावर मान्यता मिळवून देण्यासाठी संशोधन, मानकीकरण आणि वैज्ञानिक दस्तऐवजीकरणावर अधिक भर देण्याची आवश्यकता असल्याचं प्रतिपादन बिहारचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी केलं आहे.

ते आज पुण्यात भारतीय आयुर्वेद संस्थेतर्फे आयोजित राष्ट्रीय आयुर्वेद संभाष संमेलन आणि राज्यस्तरीय धन्वंतरी पुरस्कार वितरण समारंभात बोलत होते.

<><><><><>

कर्तव्यावर असताना मद्यपान करणारे एसटीचे चालक आणि इतर कर्मचाऱ्यांना तातडीनं निलंबित करावं, असे स्पष्ट निर्देश परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आज दिले.

<><><><><>

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील.

//<><><><><>//